I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 345-354
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मराठी साहित्यातील स्त्री अभिव्यक्तिचे स्वरूप

प्रफुल्ल तु. बन्सोड
राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर. जि. चद्रपूर
*Corresponding Author: prafullbansod7@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :–**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने धर्म, वर्ण, जात, लिंगविहिन समानतेचा पुरस्कार केला हे खरे असले तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या साठ वर्षाच्या कालखंडातही राज्यघटनेत नमुद असणारी समानता भारतात अस्तित्वात येऊ शकली नाही. हे खेदजनक आहे. स्त्रिया शिकल्या, कमावत्या झाल्या तरीही स्त्रियांचे आर्थिक प्रश्न सुटलेले दिसत नाहीत. स्त्रियांकडे बघण्याचा पुरूषी दृष्टीकोण अजुनही बदलला गेलेला नाही. जागतिकीकरण आणि खाजगीकरणाच्या आजच्या युगात स्त्री जीवनासंदर्भातील अनेक समस्या, गुतांगुत वाढतच गेलेली दिसते. स्त्रीचळवळ ही. हुंडाबळी, हत्या, बलात्कार, स्त्रीभूणहत्या, स्त्रीयांवरील मानसिक शारीरिक अत्याचार अशा मुलभूत प्रश्नांभोवती फिरत राहिली. ही सगळी पार्श्वभुमी १९६० नंतर स्त्रियांनी आपल्या साहित्यातून अभिव्यक्त केली आहे. साठोत्तरी साहित्यात कथा, कविता आणि कादंबरी या वाङ;मय प्रकारांमध्ये स्त्रिलेखीकांनी आपले महत्वपूर्ण योगदान दिले. या कालखंडातील साहित्याचे कालखंडानुसार दोन टप्पे मानता येतील, १९६० ते १९७५ व १९७५ ते आजतागायत. १९६० ते १९७५ या कालखंडातील बरेच स्त्रीलिखित साहित्य पारंपारिक प्रेक्ष्यातून निर्माण झालेले दिसते. कथा आणि कांदबरीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पुरूषी साहित्याचे अनुकरण झालेले दिसते. काही तुरळक लेखिकांनीच स्त्रियांच्या प्रश्नांविषयी आणि एकदंरीत सामाजिक प्रश्नांविषयी गांभीर्याने लेखन केले आहे. १९७५ नंतर मात्र युनोने जाहीर केलेल्या स्त्री दशकाच्या निमित्ताने स्त्रियांच्या प्रश्नांविषयी सजग भान निर्माण झाले. याला आपला देशही अपवाद नव्हता. १९७५ नंतर भारतात स्त्रिया संघर्ष करून आपले अधिकार मिळवण्यासाठी सिध्द झाल्या. महाराष्ट्रात स्त्रीवादी चळवळीने स्त्रियांच्या प्रश्नांविषयी जागृती निर्माण केली. याचा परिणाम असा झाला की, स्त्रिया आपल्या अस्मितेचा शोध साहित्यातून घेऊ लागल्या. मराठी स्त्री लिखित कवितेत याचे प्रतिबिंब प्रकर्षाने उमटले आहे. कथा आणि कादंबरीतून काही मोजक्या लेखिकांनी स्त्री स्वातंत्र्याची मांडणी केली. स्त्रियांच्या माणूसपणाविषयीचे विचार अभिव्यक्त केले. कौंटुबिक, सामाजिक स्वातंत्र्यापासून लैंगीग स्वातंत्र्याचा पुरस्कारही करण्यात आला. मराठी स्त्री लिखित साहित्यात १९७५ नंतर झालेले स्थित्यंतर स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचा शोध घेणारे आहेत.

**बीजसंज्ञा :–** स्त्री, लिंगविहीन, समानता, साहित्य, अस्मिता, पारंपरीक दृष्टीकोन, स्वातंत्र्य, स्त्रीवादी चळवळ.

## प्रस्तावना :–

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध अतिशय निकटचा आहे. कोणत्याही प्रकारच्या साहित्यकृतीवर त्या त्या कालखंडातील समाज व संस्कृतीची छाप स्पष्टपणे पडलेली असते, त्याचप्रमाणे एखाद्या प्रकारच्या वाद (ईझम) तयार होण्यासाठी त्या वादाच्या निर्मितीला परिपोषक अशी सामाजिक बैठक तयार होत आलेली असते. कोणताही वाद हा सुरूवातीच्या काळात बंडखोर असतो. पण त्याची पाळेमुळे समाजाच्या तथाकथीत वैचारीक स्थैर्यावर हल्ला करून नवीन विचारसरणी रूजवण्याइतकी अस्सल असतील तर ती समाज बदलविण्यासाठी दिशा देणारी ठरतात. स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास म्हणूनच समाजनिरपेक्ष चौकटीत करता येत नाही, कारण समाजात वारंवार घडू लागलेल्या स्त्रियांच्या चळवळीशी त्याचा निकटचा संबंध आहे. १९७५ नंतर पुढे महाराष्ट्रात

स्त्रियांच्या चळवळी अधिक जोमाने नेट धरू लागल्या व त्यानंतरच्याच कालखंडात स्त्रीवादी साहित्य ही नवीन संकल्पना दृढमूल झाली.

मराठी साहित्याच्या संदर्भात स्त्रीवादी साहित्याचा विचार करताना मराठी साहित्याची परंपरा यांचा विचार करावा लागेल. १९ व्या शतकाच्या मध्यापासून महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न होऊ लागले व पुढील शंभर वर्षाच्या काळात ते सातत्याने होत राहून गेल्या चाळीस वर्षांत स्त्री शिक्षण ही समाजमान्य गोष्ट झालेली आहे. तरीसुध्दा महाराष्ट्रात अजूनही फक्त चाळीस टक्के स्त्रिया साक्षर आहेत व दहा टक्के स्त्रिया उच्च शिक्षण घेत आहेत ही गोष्ट नजरेआड करता येत नाही. त्यामुळे दडपलेपणाची जाणीव, समानतेची मागणी, स्वातंत्र्याचा झगडा याची गंधवार्ताही नसलेल्या स्त्रियांची संख्याच अधिक आहे. सुशिक्षित मध्यमवर्गीय स्त्रीचा विचार करताना आजची स्त्री आर्थिकदृष्टया स्वतंत्र असली तरी मानसिक व शारीरिक स्वातंत्र्याची आंतरउर्मी स्त्रियांमध्ये अजून निर्माण झालेली नाही असे खेदाने म्हणावे लागते. स्वातंत्र्याची सर्वंकष मागणी समाजाच्या सर्व थरातून आतून आल्यामुळे १९६० नंतर अमेरिकेत स्त्रीवादी रूजू शकला, पण अशा त-हेने आपल्यावर होण-या अन्यायाविरूध्द आवाज उठविण्याचे सार्वत्रिक प्रयत्न महाराष्ट्रामध्ये झाले नाहीत. जे थोडेफार झाले त्यांचे स्वरूप राजकीय व क्षीण स्वरूपाचे आणि तात्कालिक ठरले. यामागे अनेक कारणे असू शकतात. त्यापैकी भावात्मक म्हणजे मराठी पुरूष उदारमतवादी असून स्त्रियावर दडपणूक करत नाही. अथवा अशा प्रकारे होत असलेली दडपणूक स्त्रियांना मान्य त्याविरूध्द आवाज उठविण्याची त्यांची इच्छा/ नाही. असेही असू शकते. या दोन्ही गोष्टी खोलात शिरूण अभ्यास करण्यासारख्या आहेत.

मात्र वरवर पाहाता गेल्या पीढीतील स्त्रिपेक्षा आजच्या स्त्रिचे जिवन पुष्कळ बदलेले आहे. व काही अंशी स्त्री स्वांतत्र उपभोगत आहे असे दिसून येईल. एकत्र कृटुंब पध्दतीकडून लघू कुटुंबाकडे झालेल्या वाटचालीस नैसर्गिकपणेच स्त्रीकडे पुर्वीपिक्षा वरचे स्थान आले. वाढत्या महागाईमुळे आर्थिक हातभार व आधूनिक सुख सोई मिळवण्याच्या धडपळीत नौकरी करणे अपरिहार्य झाल्याने स्त्रीला पूर्वीपिक्षा थोडे अधिक आर्थिक स्वांतत्र मिळाले. नौकरी मुळे समाजात व विशेषता पुरूष अधिक्य असलेल्या समाजात मिसळावे लागल्याने स्त्रीयांमध्ये आधिक धीटपणा आला. त्याचबरोबर शिक्षण व नौकरीसाठी एकटीने प्रवास करणे, रात्री-अपरात्री राहणे, परपुरूषाच्या सहवासात पार्टी व सहलीसाठी जाणे, सभा सम्मेलने व चर्चा सत्रातून भाग घेणे वगेरे अनेक प्रकारच्या गोष्टीमुळे अनेक पुरूषांशी स्त्रीयाच्या वेगवेगळया पातळीवर संबंध येऊ लागले. स्पर्धेमध्ये

टिकून राहण्यासाठी आपल्या स्त्रीत्वाच्या / सौंदर्याचा वापर करणे,पारंपारीक वेशभुषा सोडून देऊन प्रसंगी सोयीचे सुटसूटीत कपडे वापरणे, धकाधकीच्या जीवनात स्कुटर व मोटारीचा वापर करणे मुलांची सोय नौकरीच्या काळात पाळणा घरात करणे असे अनेक लहान मोठे निर्णय घेण्याचे स्वातंत्र स्त्रीला मिळाले की जे यापूर्वी तिच्या कक्षेत कधीच नव्हते. अर्थातच हे चित्र पाहूनही 'आजची स्त्री स्वातंत्र आहे का व तीला समाजात पुरूषाच्या बरोबरीने स्थान आहे का ? या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी देता येणार नाही हे गोष्टही तितकीच खरी आहे. कारण हे वरवरचे स्वातंत्र मिळाले तरी कुटुब व समाज या दोन्ही स्थरावर आजही पुरूषांचे अधिराज्य आहे.व शारीरिक आणि भावनीक या दोन्ही पातळीवर होणारे स्त्रीयांचे शोषण अजिबात कमी झालेले नाही. बलात्कार, हुंडाबळी, शारीरिक अत्याचार, छळवणूक यांचे गुन्हे तर वाढलेले आहेतच, पण त्याच बरोबर न नोंदवता येणारी स्त्रीयांची घरातील दडपणूक व मानसीक अत्याचार यांचे प्रमाणही वाढलेले आहेत. सामाजीक असुरक्षीतता व विद्‌वा, परित्यक्ता आणि घटस्फोटीत यांना समाजात प्रतिष्ठा नसल्यामुळे स्त्रीवरचे अन्याय दडपूण ते मुकपणे सहन करण्याकडे स्त्रीयांची वृत्ती आहे. असे दिसते. त्याचप्रमाणे धार्मीक रूढी परंपरानी सौभाग्य व योनिशुचिता या दोन गोष्टींना दिलेल्या अवास्तव मोठेपणामुळे माणूस बनण्यापेक्षा बायको बनून नव-याच्या छत्राखाली राहण्याची संस्था स्त्रीवर अधिक गडद आहेत.पुरूषांच्या समाजात वावरायला लागल्यामुळे अनेक ठिकाणी तोंड दाबून बुक्याचा मार सहन करण्याचे प्रसंगही स्त्रीवर अनेकदा येतात. सारांश, काही अंशी स्त्रीचे जीवन मोकळे झाले असले तरी आजच्या स्त्रीचे जीवन अधिक असुरक्षित, धकाधकीचे, दडपणूकीचे व दुय्यम दर्जाचेच राहीले आहे. या विरूध्द संघटीत आवाज उठविण्याचे प्रयत्न स्त्रीचळवळीच्या मार्फत काहीवेळा झाले तरी स्वातंत्र कींवा समानतेपेक्षा स्त्रीयांच्या मुलभुत गरजा भागविण्याच्या दृष्टीनेच अधिक महत्वाची असलेली भुमिका निभावण्याची त्यांची पहली गरज आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीय राज्यघटनेचे धर्म, वर्ण, जात, लिंगविहीन समानतेचा पुरस्कार केला स्वांतत्र्यानंतरच्या साठ वर्षातही अशा प्रकारची समानता भारतात अस्तित्वात येऊ शकली नाही. स्त्रिया शिकल्या मिळवत्या झाल्या तरी स्त्रियांचे आर्थिक प्रश्न सुटले नाही. स्त्रियाकडे बघण्याचा पुरूषी दृष्टीकोण बदलला नाही. जागतिकीकरण आणि खाजगीकरणाच्या आजच्या युगात स्त्री जीवनासंदर्भात अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या. स्त्री प्रश्नाची गुंतागुत वाढत गेली. स्त्री चळवळ हुंडाबळी, हत्या, बलात्कार,

स्त्री भृणहत्या, मानसिक शारीरिक अत्याचार अशा मूलभूत प्रश्नाभोवती फिरत आहे.

या पार्श्वभूमीवर अमेरिकेमध्ये वा अन्य पाश्चात्य साहित्यामध्ये आलेली स्त्रीवादी साहित्यांची चळवळ आपल्या समाजामध्ये जशीच्या तशी अपेक्षीतता येणार नाही, साहित्यामध्ये समाजातील बदलाचे पडसाद उमटणे अपिहार्य असते व समाजातील प्रस्न कित्येकदा समाजापुढे पुरोगामी साहित्यामधूनच प्रथमच आलेले दिसतात. या दृष्टीने आधुनिक मराठी साहित्याकडे पाहिले तर स्त्रीयांच्या बदलत्या आयुष्याची दखल काही एका मयदिपर्यंतच मराठी साहित्याने घेतलेली आहे असे दिसून येईल.

**स्त्री साहित्याची पार्श्वभूमी**

स्त्रिया जेव्हापासून लिहायला लागल्या तेव्हापासूनचा इतिहास जरी तपासून पाहला तरी स्त्रियांची बंडखोरी दडपण्यावर किंवा त्याचे उदात्तीकरण करण्यावरच पुरेशी वर्चस्वाचा भर दिसतो. मध्ययुगीन कालखंडातील स्त्री संतापासून याचा विचार करता येईल. महानुभाव पंथात असलेली कवियित्री महदंबा हिच्या पासुन हा विचार करता येईल. महंदबेने धवळे निर्माण केले पण ही तीची निर्मीती उत्स्पुर्त मानली गेली नाही.

वारकरी संप्रदायात नावलौकीक मिळवणा-या कवियत्रीविषयी म्हणता येईल. प्रतिनिधीक दोनच उदारणे पुरेशे आहेत. ते म्हणजे मुक्ताबाई आणि जनाबाई यांचे मुक्ताबाई ज्ञानेश्वराची बहीण. अध्यात्मीक क्षेत्रात तीचा अधिकार मोठा होता. पण समाजाने वाळीत ताकलेले हे कुटुंब आई-वडीलांच्या आत्महत्येनंतर निर्वासिताचे आयुष्य जगत होते. त्यामुळे मुक्ताबाईच्या अध्यात्मिक अधिकाराविषयी समाजाला काहीही घेणे-देणे नव्हते. उपेक्षितांचे आयुष्य तिच्या वाटेला आलेले होते. अर्थात तिच्या बरोबर निवृत्ती-ज्ञानदेव-सोपान हे तिचे बंधुही होते. पण एक स्त्री म्हणून मुक्ताबाईची काय अवहेलना झाली असेल हा संशोधनाचा विषय आहे. आपला प्रखर मुक्तीचा स्वर अंभगातुन मांडणारी जनाबाई आयुष्यभर नामयाची दासी राहिली.

“डोईचा पदर आला खांदयावरी। भरल्या बाजारी जाईन मी।
हाती घेऊन टाळ, खांदयावरी वीणा। आता मज मना कोनकरी ।
पंढरीच्या पेठे मांडीयेले पाल । मनगठावरी तेल घाला तुम्ही ।
जनी मने देवा मी झाले विसवा । निघाले केशवा घर तुझे ।
देव खाते देव पिते । देवावरील मी निजते
देव देते देव घेते । देवासवे व्यवहारीते
देव येथे देव तेथे । देव विन नाही रीते
जनी मने विठाबाई । भरूनी उरले आंतरबाही ।’’

हा जनाबाईचा अभंग त्यांची मुक्तीचा आच किती प्रखर होती हे स्पष्ट करणारा आहे. तत्कालीन समाजाला सोयीस्कर असा

मुक्तीचा मार्ग जनाबाईनी शोधून काढला. आणि विठाबाशी तादात्म्य साधले. जगाचे सगळे नियम तुळवून त्या विठोबाशी एकरूप झाल्या.

**साठोत्तरी लेखिका**

१९६० हा मराठी साहित्याचा दृष्टीने एक महत्वपूर्ण टप्पा माडंला जातो. नवसाहित्याच्या दिशा १९६० नंतर स्पष्टपणे लक्षात यायला लागले. १९४५ नंतर होवू लागलेला साहित्यीक बदल १९६० नंतर साहित्य क्षेत्रात सर्व मान्य झालेले दिसतात. १९६० नंतर अनेक लेखिका नव्या मुल्यांच्या स्विकार करून आपल्या प्रकृती धर्मानुसार लिहित्या झाल्या. वैचारीक लेखन, कथा, कांदबरी, कविता आणि आत्मचरित्राच्या क्षेत्रात स्त्रियांनी आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटवीली. १९६० ते २०११ या पन्नास वर्षाच्या कालखंडात स्त्रीयांच्या साहित्यात बदल होत गेले. या बदल्याच्या मागोवा घेत असतांना पारंपारिक साहित्य निर्मीतीची मुल्ये आणि स्त्रीवादी नव्या जाणीवेची मुल्ये यांचा संघर्ष स्त्रियांच्या साहित्यात उमटलेला दिसतो. लेखिकांची जळणघळण पुरूषत्ताक व्यवस्थेचा परिप्रेक्षात झालेली असते. व्यवस्थेचे संस्कार लेखिकाच्या मनावरही पक्के असतात. आणि त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. त्यामुळे नव्या जाणीवा पचवून त्यांची अभिव्यक्ती करणे वाटते तेवढी सोपी बाब नाही. सगळयाच लेखीकांना ते जमेल असे ही नाही. १९७५ नंतर लेखन करणा–या लेखिकांच्या साहित्यातुन काही स्त्रीवादी मुल्य प्रखरपणे समोर आलेली दिसतात. गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, प्रिया तेंडुलकर, कविता महाजन यासारख्या लेखिकांच्या कथा कांदब–यामधून हा दृष्टीकोण काही प्रमाणात प्रकट झालेला दिसतो. पण मुददाम ठरवून या लेखिकानी हे लेखन स्त्रीवादी दृष्टीकोण अंगीकारून केले असे म्हणने योग्य ठरणार नाही, तर माणूस म्हणून जगताना समाजाने लादलेली बाई म्हणून जगण्याची मुल्य नाकारून जो नवा अवकाश समोर आला तो या लेखिकांनी आपल्या साहित्यातुन मांडला. १९७५ नंतर स्त्रीची माणूस म्हणून जगण्याची गरज स्पष्टपणे पुढे आली. पुरूषत्ताक व्यवस्थेत होणारी शारीरिक आणि मानसिक घुसमट तीला असहय व्हायला लागली. या अवस्थेचा स्वर या लेखिकांनी आपल्या साहित्यातुन मांडला. कथा कांदबरी प्रमाणेच कवितेच्या क्षेत्रातही मलिका अमर शेख, रजनी परूडेकर, अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर, ते आताच्या संध्या रंगारी पर्यंत अनेक कवयित्रींनी माणूस म्हणून जगण्याची आपली आस स्पष्ट केली. आत्मचरीत्राच्या क्षेत्रात मलिका अमर शेख सुनिता देशपांडे, उर्मिला पवार यानी ही जानीव मांडण्याचा प्रयत्न केला. अशा मोजक्या काही लेखक–कवयित्री सोडून दिल्या म्हणजे लेखक कवयित्रीच्या मोठा वर्ग

पारंपारीक परिप्रेक्षातुन लेखन करीत राहीला.

## साठोत्तरी कथा लेखिका

१९६० नंतर अनेक लेखिका लिहू लागल्या. या कालखंडातील नियतकालींकानी लेखिकाच्या कथा कवितांना मोठया प्रमाणात प्रसिध्दी झाली. कथेच्या क्षेत्रात स्त्रियांनी फार मोठे योगदान दिले पण या लोकप्रिय मनोरंजन कथेचे प्रमाण मोठे आहे. स्नेहलता दसनुरकर, क्षैलजा राजे, शंकुतला गोगटे, वसंधुरा पटवर्धन या लेखिका १९६० पर्यंत कथा लेखन करीत होत्या. या सर्वच लेखिकाच्या कथेतुन कमी अधिक प्रमाणात मनोरंजनवादी दृष्टीकोन डोकावतांना दिसतात. १९६० नंतर जोत्स्ना देवधर, विजया राजाध्याक्ष, आशा बगे, कमल देसाई, अरूणा ढेरे, यासारख्या लेखिंकानी कथेच्या क्षेत्रात आपले महत्वपूर्ण योगदान दिले. यासर्व लेखिंकाच्या कथा स्त्री जीवनातील अनुभवावर आधारीत आहे. अर्थात स्त्रीयांचे अनुभव क्षेत्र प्रामुख्याने घर हे असल्यामुळे त्यांच्या कथाच्या आशय विश्वावर मर्यादा पडलेल्या दिसतात. १९६० नंतर मात्र स्त्रींयाच्या अनुभव विश्वाची सुत्रे बदलेली दिसतात. परिघ व्यापक झालेला दिसतो. जगाकडे उघडया डोळयानी बघताना आलेले अनुभव या कथामधून चित्रीत झालेले दिसतात.

## साठोत्तरी कवयित्री

कथेप्रमाणे कवितेच्या क्षेत्रातही अनेक कवयित्रीनी आपल्या सहभाग नोंदविला आहे. सावित्री फुले यांच्या पासुन सुरू झालेली ही काव्य परंपरा मलिका अमर शेख, रजनी परूळेकर यांच्या पर्यंत येवून पोहचली. लक्ष्मीबाई टिळक यांच्या ‘भरली घागर हा काव्य संग्रह आणि बहिणाबाई चौधरी यांची‘ बहिणाबाईची गाणी १९५० पूर्वीचे काव्य लेखन आहे. या नंतर इंदीरा संत यानी प्रस्थापीत काव्य विश्वात आपले वैशिष्टय पुर्ण स्थान निर्माण केले. मृण्मयी, चित्कळा, वंशकुसुम, निराकार यासारखे त्यांचे काव्य संग्रह प्रकाशित आहेत. (१९८१ ते २००० या कालखंडात) त्याआधी शेला ,मैंदी, मृगजळ, रंगबावरी, बाहुल्या, हे काव्य संग्रह १९५० ते १९७५ या कालखंडात प्रसिध्द झाले विशुध्द भाव कवितेची निर्मीती इंदीरा संत यानी केली. इंदीरा संत, शांता शेळके, शिरीष पै. यांचा कवितेतील स्थिंतातराविषयी प्रभा गणोरकर यांनी म्हटले आहे, “स्वातंत्र्योत्तर काळात १९६० नंतर आणि पुढे १९७५ नंतर भारतीय समाज जिवनात जी स्थितंतरे होत गेली. समाजवास्तव बदलत गेली. त्याचेही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम याकाळातील परिणाम होत गेलेली दिसतात. आणि ते नव्या विधीच्या कवयित्रीच्या कवितेतुनच दिसतात. असे नाहि तर १९६० पर्यंतच्या काळात सुप्रतिष्ठीत झालेल्या इंदीरा संत शांता शेळके, शिरीष पै. कवियित्रीच्या

कवितेतुनही जाणवतात.''१ १९६० नंतर बदलत्या जीवनजाणिवांच्या परिणाम प्रस्थापीत कवियित्रीवर देखील झालेला दिसतो. त्यातुनच त्यांचे काव्यविषय बदलेले दिसतात. पण तरीही त्यांची कविता त्यांच्या मूळ पिंड धर्माशी इमान राखणारी आहे. असेच म्हणावे लागेल. पारंपरिक प्रेक्ष्यातून जगणारी स्त्री आणि समाजाची आदर्श स्त्री विषयी असलेली पारंपरिक धारणा या कवियित्रींच्या मनावर पक्की ठसलेली दिसते आणि त्यामुळे त्यांची कविता पारंपरिक परिघाबाहेर जाऊन मानवी मूल्यांचा शोध घेताना आढळत नाही.

" १९८० पूर्व स्त्रीकाव्याने भावकवितेचे एक उत्तुंग शिखर इंदिरा संतांच्या काव्यरूपाने उभे केले आहे, स्मृतिजीवन प्रत्यक्ष अनुभूतीच्या क्षण आणि वास्तवातून त्याचे कलेले सुक्ष्म व्यामिश्र प्रतिमांकन हा इंदिरा संताचा वारसा १९८० नंतरच्या कवयित्रींनी निश्चिपणे स्वीकारला आहे व पुढे चालवला आहे.''२ इंदिरा संत यांच्या कवितेचा प्रभाव मराठी कवयित्रींवर निर्विवादपणे पडला. प्रस्थापित कवींमध्ये इंदीरा संत यांना महत्वपुर्ण स्थान मिळाले. त्याचबरोबर शांता शेळके, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शिरीष पै, अनुराधा पोतदार, प्रभा गणोरकर या कवयित्रीचे काव्यलेखन १९६० पूर्वीचे सुरू झालेले आहे. १९६० नंतरच्या बदलत्या जीवन जाणिवांचा परिणाम या कवयित्रींवर झालेला दिसतो पण तरीही सामाजिक वास्तवापासून ही कविता दूरच राहिली. १९६० नंतरच्या मराठी काव्यविश्वावर मर्ढेकरी कवितेचा प्रभाव पडलेला दिसतो. अलघुनियकालिकांच्या चळवळीतून अनेक नव्या प्रश्नांची मालिका पुढे आलेली दिसते. त्याचबरोबर दलित कवींनी येथल्या प्रस्थापित व्यवस्थेसमोर अनेक प्रश्न निर्माण केले. अशा परिस्थितीत स्त्रियांची कविता मात्र या सगळ्या प्रश्नापासून लांब राहिलेली दिसते. एक दोन अपवाद सोडता मर्ढेकरी परंपरेचा स्वीकार कवयित्रींनी केलेला दिसत नाही. अर्थात पुरूष निर्मित नवकाव्यविषयी अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात. " मराठी कवितेत नकार-स्वीकार, निषेध, स्वागत, वेदना, वेदना, विद्रोह, नपुंसकत्व, आशावाद – निराशावाद अशा उलटसुलट प्रवृत्तीचे नुसते जंगल माजले आहे. प्रा. वसंत बापट यांनी तर एका भाषणात म्हटलेच आहे की, आजच्या मराठी कवितेत कवीचे चेहरेच नाहीसे होत आहेत. कवितांच्या नाना कळा मावळत चालल्या आहेत. यौवनविलास, सौंदर्य , प्रिती, यासारख्या नाजूक सौंदर्यांना हदपार करण्यात आले आहे. कवी कलेविषयी बेफिकीर होऊ लागले आहेत. उपकरणांविषयीची अनास्था निर्माण झाली आहे. कारण कवितेने आज अनेक प्रस्नचिन्ह निर्माण केले आहेत.

**साठोत्तरी स्त्री कादंबरीकार**

कथा आणि कवितेप्रमाणेच कादंबरीच्या क्षेत्रातही स्त्रियांनी आपली महत्वपूर्ण

कामगिरी बजावली आहे. १९६० नंतर जे नवे प्रवाह मराठी कांदबरी विश्वात निर्माण झाले त्याचे प्रतिबिंब स्त्री लिखित कादंब-यामधूनही उमटले . ऐतिहासीक, पौराणिक, अस्तिववादी, ग्रामिण, प्रादेशिक अशा विविध प्रवाहांध्ये स्त्रियांनी कादंब-यांची निर्मीती केलेली दिसते. यातील बरेच कादंबरी वाङ्:मय हे अनुकरणातून म्हणजेच प्रस्थापित पुरूषी व्यवस्थेने निर्माण केलेल्या कांदब-याची निर्मिती केलेली दिसते. फडके – खांडेकरी प्रभावातून मनोरंजनात्मक कांदब-याची निर्मीती करणारा स्त्रियांचा एक मोठा गट १९९० पर्यंत मराठी कांदबरी विश्वात होता. १९६० नंतर स्त्रीवादी चळवळीच्या अनुषंगाने जागृत झालेल्या स्त्री जानीवांचे चित्रण करण्याचा प्रयत्न स्त्री कांदबरी कारांनी केला. स्त्रीयांच्या प्रश्नांना प्राधान्य देवून प्रभावी पणे साहित्य निर्मीती करणा-या लेखिका म्हणून विभावरी शिरूरकर यांचा गौरव केला जातो. 'हींदोळयावर' या कांदबरीत लग्न व्यवस्थेला नाकारणा-या नायीकेची समाजाच्या दुटटपी धोरणामुळे होणारी दोलनामय स्थिती त्यांनी चित्रीत केली आहे. त्याचबरोबर बळी सारख्या कांदबरीतुन अस्पृश्यतेसारख्या सामाजिक प्रश्नांच्या वेध घेत सामाजिक वास्तव प्रभावीपणे मांडले आहे. विभावरी शिरूळकरांनी शबरी, जाई यासारख्या कांदब-यामधून स्त्रीप्रश्नांचा वेध घेतला आहे. आणि या प्रश्नांना समाजशास्त्राची बैठक आहे. हे झाले विभावरीच्या कांदबरीच्या बाबतीत, पण एंकदरीत आधुनिक मराठी कांदबरीच्या निर्मीतीपासुन स्त्रीयांच्या प्रश्नांना कांदबरी वाङ्:मयात प्राधान्य मिळालेले दिसते. ह. ना. आपटे यांनी स्त्रियांच्या तत्कालीन वास्तव प्रस्नाची माडंणी आपल्या कांदब-यामधून केली. एकत्र कुटुंब पध्दतीत स्त्रीयांची होणारी अवहेलना ते केशवपणापर्यंतचे प्रश्न त्यांनी 'पण लक्षात कोण घेतो.' या कांदबरीतुन मांडले. श्री. व्य. केतकर, वा. म. जोशी यांनी देखील स्त्रीयांच्या प्रश्नांचे गांभीर्यान विवेचन केले. बाबा पद्मनजी यांनी ' यमुना पर्यटन ' मधून तत्कालीन स्त्रीयांची परिस्थिती चित्रीत केली. एकंदरीत आधुनिक कादंबरीच्या जन्मापासुनच स्त्रीप्रश्नांची माडंणी कांदबरी वाङ्:यातून झालेली दिसते. प्रभोधन चळवळीचे प्रतिंबीब १९१५ ते १९४० या काळात निर्माण झालेल्या कादंब-यामधून प्रत्ययाला येते. या पार्श्वभुमीवर स्त्रिलीखीत कांदब-याचा विचार केला तर काही मोजक्याच स्त्रियांनी यथार्थपणे सामाजिक व स्त्रिप्रश्न विषयक चित्रण कांदब-यामधून केलेले दिसते. यांची सुरूवात वर सांगीतल्याप्रमाणे विभावरी शिरूरकर यांच्या पासुन झाली. गीता साने यांनी देखील स्त्रियांच्या प्रश्नांचा वेध आपल्या कांदब-यामधून घेतलेला दिसतो. निखळलेले हिरकणी, वठलेला वृक्ष, हीरवळी खाली यासारख्या कांदब-या मधून स्त्रि-पुरूष

संबंधाचा वास्तव वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो.

साठोत्तरी कांदबरीच्या प्रवाहात जोत्स्ना देवधर यांचे योगदान लक्षात घ्यावे लागते. 'घर गंगेच्या काठी', 'कल्याणी' या कांदब-यामधून जोत्स्ना देवधर यांनी तत्कालीन स्त्रीयांचे सामाजिक स्थान शोधण्याचा प्रयत्न केला. एकत्र कुटुंब पदधतीत स्त्रीयांची होणारी अवहेलना त्यातुन होणारा संघर्ष यांचे चित्रण या कादंबरीत केलेले आहेत. १९८६ मध्ये प्रकाशीत झालेल्या 'कल्याणी' या कादंबरीत वैधव्याच्या शापामुळे कुटुंबाची होणारी वाताहत स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर पडझड, चिमणीचा घर मेणाचा, एक अध्याय ऐलतीवर पैलतीवर , एक श्वास यासारख्या कादंब-याधून देवधरानी स्त्रीप्रश्नांचा वेध घेतला आहे. अर्थात जोत्स्ना देवधर यांचा भर कुटुंब पध्दतीवर आहे. या विषयी मत व्यक्त करतांना त्या म्हणतात, "एकत्र कुटुंब पध्दतीतील उण-पाऊस अंगावर घेत असल्यामुळे माझ्या लेखणाला कौटुबिंक चौकट आपोआप मिळाली." एकंदरीत कुटुंबातील ताणतणाव त्यामुळे स्त्रीयांची होणारी ओढाताण त्यातुन निर्माण होणारा कौटुबिंक संघर्ष यावर जोत्स्ना देवधर भर देतात.

याच काळात मालती दांडेकर, योगिनी जोगळेकर, शैलेजा राजे, कुमुदिनी रांगणेकर या मोठया प्रमाणात मनोरंजन प्रधान कांदब-याची निर्मिती करत होत्या. शंकुतला गोगटे यांच्या पंचवीसपेक्षा जास्त कांदब-या प्रकाशीत आहेत. त्यांच्याही कादंब-या मनोरंजप्रधान गटातच मोडतात.

१९७५ नंतर गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, कविता महाजन अशा काही लेखिकानी आपल्या कांदबरी वाङ्‌मयातून आत्मनिर्भर स्वतंत्र स्त्रियांचे चित्रण केले. कविता महाजन यांच्या 'ब्र' आणि 'भिन्न' या दोन्ही कांदब-या रिपोर्ताज स्वरूपाच्या आहेत. स्त्री जीवनातले राजकीय, सामाजिक प्रश्न घेऊन त्याविषयीची प्रखर आणि वस्तुनिष्ठ माडंणी त्यांनी आपल्या कादंब-यांमधून केली आहे. स्त्री आणि समाज यातील द्वंद्व आणि स्त्रियांचे प्रश्नांचे संजग भान त्यांच्या कादंब-यामधून स्पष्ट झाले आहेत. गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया या लेखिका मराठी कांदबरीचा विश्वास स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखल्या जातो. पण त्यांनी चित्रीत केलेली स्त्री ही उच्च मध्यम वर्ग आणि सुधारणावादी दृष्टीकोण अंगीकारलेल्या वर्गातील आहे. त्यामुळे त्यांच्या वाङ्‌मयाला मर्यादा पडलेल्या दिसतात. स्त्रियांच्या माणूस म्हणून विचार या लेखिका प्रभावीपणे करतात. पण या लेखिकांना फारशा सामाजिक अडचणीना सामोरे जावे लागत नाही. म्हणजे ज्या अडचणींना भारतातील सर्वसामान्य स्त्री सामोरे जाते. जे प्रश्न तिच्या भोवती घोगावत असतात. त्यापेक्षा या कांदबरी

करांचा नाईका पुढे प्रश्नांचे स्वरूप वेगळे आहे. शांता गोखले यांनी आपल्या दोन कांदब-यामधून (रिटा वेलीनीकर आणि त्यावर्षी) आधुनिक स्त्रीपश्नांचा प्रभावीपणे वेध घेतला आहे.

साठोत्तरी साहित्यात कथा, कविता आणि कांदबरीच्या क्षेत्रात स्त्रियांनी आपले महत्वपुर्ण योगदान दिलेले दिसते. या कालखंडातील साहित्याचे कालखंडानुसार दोन टप्पे माडंता येईल १९६० ते ७५ तसेच १९७५ ते आजतागायत. १९६० ते ७५ या कालखंडातील बरेच स्त्रीलीखित साहित्य पारंपारीक प्रेक्षातुन निर्माण झालेले दिसते. कथा आणि कांदबरीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात पुरूषी साहित्याचे अनुकरण झालेले आहे. काहि तुरळक लेखिका स्त्रियांच्या प्रस्नांविषयी आणि एकंदरीत सामाजिक प्रस्नाविषयी गांभीर्याने लेखन करतांना दिसतात. बहुतेक लेखिकांनी मनोरंजनवादी दृष्टीकोण डोळयासमोर ठेवून सर्वसामान्य वाचकांच्या मनोरंजानासाठी कथा आणि कांदबरीची निर्मीती केलेली दिसते. १९७५ नंतर मात्र युनोने जाहिर केलेल्या स्त्री दशकाच्या निमित्ताने स्त्रियांच्या प्रश्नांविषयी संजग भान निर्मान झाले. याला भारतही अपवाद नव्हता. १९७५ नंतर भारतात स्त्रिया संघर्ष करूण आपले अधिकार मिळवण्यासाठी सिध्द झाल्या. महाराष्ट्रात स्त्रीवादी चळवळीने स्त्रियांच्या प्रश्नांविषयी जागृती निर्माण केली. याचा परिणाम साहित्यावर झाला. स्त्रिया आपल्या अस्मितेचा शोध साहित्यातुन घेवू लागल्या. मराठी स्त्रीलिखित कवितेत याचे प्रतिबिंब उमटले स्त्रीयांवर होणारे अन्याय अत्याचाराच्या आणि दुय्यम पाढा कवितेतुन मांडला गेला. कथा आणि कांदबरीतुन काही मोजक्या लेखिकांनी स्त्रि स्वातंत्र्याची मांडणी केली. आणि स्त्रियांच्या माणूसपणाविषयीचे विचार अभिव्यक्त केली. कौटुबिंक;सामाजिक स्वांत्र्यापासून लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार या लेखिकांनी केला. मराठी स्त्री लिखित साहित्यात १९७५ नंतर झालेले बदल स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचा शोध घेणारे आहेत.

**संदर्भ :-**

मंदा खांडगे-स्त्री साहित्याचा मागोवा खंड-२

रा. ग. जाधव-आधुनिक मराठी कवयित्रीची कविता पृष्ठ-११

डॉ. शरणकुमार लिंबाळे - साठोत्तरी मराठी वाङ्:मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन शनिवारपेठ पुणे.२००७

डॉ. अश्विनी धोगडे-स्त्रीवादी समिक्षा-स्वरूप आणि उपयोजन दिलीपराज प्रकाशन, शनिवार पे. पुणे - १९९२

विमल भालेराव-आधुनिक मराठी वाङ्:मयातील स्त्रीयांची आत्मचरित्रे, एक अभ्यास, साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी नागपूर

डॉ. वंदना महाजन - स्त्रीवादी आणि साहित्य विजय प्रकाशन, नागपूर २०१५